मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
जलसंपदा
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ७.०७.२०१६

"विवेकाचे दुसरं नाव विचार आहे" या आपल्या पुस्तकाच अवलोकन केलं. पाणी, प्रदुषण, वाहतुक, शिक्षण या महत्वाच्या प्रश्नांसोबतच भ्रष्टाचार, आरोग्य, पर्यावरण, आर्थिक समस्या इ. समस्या समाजाला फार मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहेत. यावर मात करण्याच्यादृष्टीने प्रथम समाजातील सर्व घटकांकडून या समस्यांबाबत विचार मंथन करणे गरजेचे आहे. हक्क आणि कतव्ये समजून घेतल्यास एक आदर्श समाज घडू शकेल, याची मला जाणीव आहे. परंतू त्यासाठी चळवळ उभी राहणे आवश्यक आहे. समाजातील विविध समस्यांबाबत आपण मांडलेले विचार अमलात आणणे कठीण नाही, मात्र त्यासाठी मनस्वी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून सुसंस्कृत व सुदृढ समाज कसा असावा हे मांडण्याचा आपला प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद स्तुत्य आहे.

आपण प्रकाशित केलेल्या पुस्तकास तसेच आदर्श समाज घडविण्याच्या आपल्या चळवळीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.

(गिरीष महाजन)

डॉ. विवेक क्षीरसागर
फ्लॅट नं.२, प्लॉट नं.९, सांदिपनी बिल्डींग,
रघुवीरनगर को.हौ.सो., रघुवीरनगर,
धनकवडी, पुणे ४११०४३.